# गट व समूह निर्मिती

1) गट व समूह निर्मितीची आवश्यकता

1.1 शेती उत्पादक खर्च कमी करणे.

शेतीमाल उत्पादनासाठी प्रामुख्याने खालील बाबी उत्पादन खर्चामध्ये येतात.

1) बी - बीयाणे अथवा रोपावरील खर्च .

2) खते

3) किटकनाशके.

4) शेती उपयोगी औजारे

5) सिंचन सुविधा

6) मजुरी

7) विक्रीव्यवस्थेमधील खर्च

सद्यस्थितीत विचार करता उपरोक्त 7 ही घटकामध्ये दिवसोदिवस खर्चवाढ होते आहे. शेतकरी हा बियाणे, खते

औषधे, सिंचन सुविधा (पाईप , तुषार,ठिबक इ. ) या बाजारामधुन खरेदी करीत असतो. यामधील काही खतांचा अपवाद वगळता जवळपास सर्वच निविष्ठा या खाजगी कंपनी / विक्रेते यांचेमार्फत घ्याव्या लागत आहेत. त्यामध्ये असलेल्या कमिशन पध्दतीमुळे शेतकऱ्याचे हातात निविष्ठा येईपर्यंत त्यांच्या उत्पादन मुल्यापेक्षा कितीतरी अधिक पणन व्यवस्थेतील जादाचा अधिभार सोसावा लागतो. मात्र समूहामार्फत या निविष्ठाची खरेदी सरळ उत्पादकामार्फत करणे सुरु केल्यास निश्चितच व्यापाऱ्यांचे कमिशनची रक्कम

कमी होवून या निविष्ठा त्या शेतकऱ्यांना कमी रकमेत उपलब्ध होवू शकतील उदा. किटकनाशकांचे दर शासन नसल्याने यामध्ये उत्पादक कंपन्या विक्रेत्यांना विक्रीसाठी किमान 25 टक्के पासुन 40 टक्यापर्यंत कमिशन देतात परिणामस्वरुप तेवढ्या रकमेचा बोजा शेतऱ्यांवर नाहक पडतो. याच निविष्ठा, समुह कृ.वि.अ. मार्फत विक्री परवाना घेवून कंपनीकडून सरळरित्या सवलतीच्या दरात घेवू शकतात. त्याचप्रमाणे आपणास विहीतच आहे की शेतकरी कुटूंबाचे धारणक्षेत्र दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. पुणे जिल्ह्याचे सद्याचे सरासरी धारणक्षेत्र 1.56 हे (2001 नुसार ) आहे. कमी असणाऱ्या धारणक्षमतेमुळे काही उपयुक्त शेती औजारे केवळ जादा किंमतीमुळे शेतकरी घेवू शकत नाही. किवा घेतले तर त्याची वापरक्षमता पुर्णपणे उपयोगात नप आणल्याने उत्पादनावरील खर्च वाढून जातो उदा. पॉवर टिलर, ट्रॅक्टर, मळणी यंत्र इ. त्यामुळे बऱ्याचदा योग्य औजाराअभावी मजूरीवरील खर्चात वाढ अथवा योग्य वेळेस अशी औजारे उपलब्ध उत्पादनातील नुकसान यामुळे शेतकऱ्यास हाल अपेष्टा, जास्तीचे आर्थिक नुकसान सोसावे लागते. मात्र या सर्व बाबींवर गट /समुहाचे माध्यमातून मात करता येवू शकते. उदा. पॉवर स्प्रेअर्स सारखे फवारणी पंप शेतकरी 20 जणांच्या गटात 2 ते 3 ठेवून सभासदांना गरजेनुरुप ती उपलब्ध करुन देवू शकतात व एकट्याने घ्यावयाच्या पंपाच्या किंमतीचा बोजा हा एकट्या शेतकऱ्यावर पडणार नाही उत्पादन खर्चामध्ये बचत होण्यासाठी गटाचा फायदा वरील दिलेल्या उदाहरणाबरोबरच खालील नमूद बाबीमध्ये सुध्दा होवू शकतो.

1) तुषार सिंचनाचे संच गटामध्ये प्रत्येक शेकऱ्यांकडे न घेता 2 ते 3 संच ठेवून ते आपआपसात गरजेप्रमाणे वापरणे.

2) संरक्षित ओलीतसाठी डिझेल / पेट्रोकेरोसीन पंप.

3) एकत्रीत विक्रीव्यवस्था करणे.

4) ग्रामबिजोत्पादन कार्यक्रमाद्वारे गटाची बियाणे गरज भागविणे.

## 1.2 आधुनिक उत्पादन तंत्राचा अवलंब

व्यक्तिगतरित्या शेतकऱ्यांकडे असणारी अपूरी माहिती, अंपूरा वेळ व निधीची कमतरता यामुळे शेतकरी नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्यासाठी कृषि विद्यापिठ, देशपातळीवरील संशोधन केंद्र येथे जावू शकत नाही परिणामस्वरुप पारंपारिक पध्दतीने शेती करण्याकडेच त्याचा कल राहतो व त्यामुळे त्यांचा प्रगतीचा वेग मंदावतो त्यामुळे देशाच्या कृषि विकासाचा दरदखील पुढे जात नाही मात्र शेतकरी गटाने एकत्र आल्यास शेतीशाळा, सहली यामाध्यमातमून नवनवीन तंत्रज्ञान जाणून घेवू शकतो व गटामध्ये अंमलबाजावणी करु शकतो. सद्यस्थितीत शेतकरी गटाने एकत्र येऊन शेडनेटहाऊसची उभारणी करत आहेत व एकत्र मालाचे मार्केटींग करत आहेत. ही बाब केवळ गटामुळेच घडत आहे. हे स्विकारावेच लागेल.

## 1.3 शेतीमालाचे मुल्यवर्धन

सद्यस्थितीत विचार करता गट व समूहनिर्मितीचा सर्वाधिक फायदा मुल्यवर्धनामुळे शेतकऱ्यांना होऊ शकतो. मुल्यवर्धन ही फार मोठी संकल्पना आहे. बऱ्याचदा केवळ शेतीमालावर प्रक्रिया करणे. म्हणजेच मुल्यवर्धन असा आपण समज करुन घेतो. मात्र मुल्यवर्धन या शब्दामध्येच ही संकल्पना स्पष्ट होते. शेतीमालास शेतकऱ्यास जो प्रचलीत पध्दतीने दर मिळणार आहे. त्यामध्ये येणेकेनेप्रकाराने अधिकची वाढ मिळविणे म्हणजे मुल्यवर्धन होय उदा. शेतकऱ्यांनी टोमॅटोची काढणी केल्यानंतर कोणतीही प्रक्रिया न

करता ताजी टोमॅटो बाजारसमितीमध्ये व्यापाऱ्याकडे न पाठविता त्या गटाने शहरातील किरकोळ विक्रेत्यांना सरळ रित्या विक्रीस पाठविल्यास मधला वाचलेला खर्च व त्यामुळे सरळ विक्रीमध्ये वाढलेले प्रयत्न म्हणजेच **मूल्यवर्धन** ठरणार आहे. त्यामुळे शेतीमाल उत्पादीत झाल्यानंतर गटाने एकत्रितरित्या प्रयत्न केल्यास निश्चितच विविध उपायाद्वारे त्यांचे मूल्यवर्धन होवू शकते यासाठी खालील काही उदाहरणे आपणास उपयुक्त ठरतील.

1) तुर, मुग व हरभरा यांची डाळ करणे.

2) अन्नधान्य (ज्वारी, बाजरी , गहु इ. ) ची 5 ते 10 किलोग्रॅमचे पॅकींग करणे.

3) भाजीपाला स्वच्छ करुन 200 ते 300 ग्रॅम पॅकींगमध्ये कापून, चिरुन, स्वच्छ करुन पाठविणे

4) नाशवंत मालावर प्रक्रिया करुन पदार्थ तयार करणे, उदा. टोमॅटोचे विविध पदार्थ, फळांचे पल्प

## 1.4 पणन व्यवस्थापन

सामूहीक पातळीवर गटाचे माध्यमातून बाजारपेठाचा शोध, मालाची साठवण, वाहतूक पॅकींग, बाजारपेठेमधील मागणीनुसार पीक बदल, तसेच एकत्रित मालाची विक्री इ. उपाययोजनांचा अवलंब करुन गटामधील सभासदांना फायदा मिळवून दिला जावू शकतो.

## गट व समूहनिर्मिती मधील अनुभव

कृषि विभागामार्फत यापुर्वी कृषि विज्ञान मंडळाच्या माध्यमातून अथवा कृषि क्षेत्रात महिलांचा सहभाग हया योजनेच्या माध्यमातुन कार्य करण्यात आले आहे. मात्र यामधील बरेचसे गट सक्रिय न राहण्याची पुढील कारणे सांगता येतील.

1) गटांना ठोस अंमलबजावणीसाठी उद्दीष्ट देण्यात आलेले अपयश.

2) गटांची संस्थात्मक रचना न केल्याने सदरचे गट औपचारीक स्वरुपाचे राहीले. उदा. बचत गटाच्या चळवळीने गटांनी नियमित बचत करणे, बँकेत खात्यावर बचत करणे, गटांच्या नोंदवह्या ठेवणे इ. संस्थात्मक रचना असल्याने गट कार्यान्वित राहण्यास मदत झाली मात्र कृषि विभागाने पुरस्कृत केलेले गट काही विशिष्ट प्रयोजनापुरते एकत्र आणले ते प्रयोजन पुर्ण झाल्यानंतर त्यांना पुढे कोणता कार्यक्रम नसल्याने ते आपोआप निष्क्रीय बनले.

3) गटाच्या कार्यपध्दतीवर संनियंत्रण व समन्वय ठेवण्यात विहिर पध्दती नसल्याने गटांमध्ये शैथिल्य निर्माण झाले. बऱ्याचदा विविध योजनाअंतर्गत गटनिर्मिती केल्यानंतर कृषि सहाय्यकांनी सुरुवातीस गटाच्या सभामध्ये सहभाग घेतला मात्र नंतर त्यांचेवर असलेल्या इतर जबाबदारीमुळे गटांशी समन्वय करण्यासाठी कृषि सहाय्यक वेळ देवू शकला नाही.

4) गट एक संघ राहण्याचे दृष्टीने गटामधील सदस्यांमध्ये एकमेकाप्रती जिव्हाळा,प्रेम, सहकार्याची भावना निर्माण करण्यासाठी वेगळे प्रयत्न न केल्याने गटामधील सदस्यामध्ये केवळ विकासाचे काही कार्य करण्यासाठी व त्याद्वारे त्यांचे व्यक्तिगत आर्थिक फायदे मिळविण्याच्याच अपेक्षा राहिली व अशी अपेक्षा सतत पुर्ण होणे अशक्य असते व ती होत नसल्याने सदस्यांमध्ये नैराश्य उत्पन्न झाले व फायदा काहीच होत नाही तर नुसते गप्पा मारायला गटामध्ये राहण्यात काय अर्थ आहे. अशी भावना निर्माण होऊन सदस्य गटापासुन दूरावत गेले.

5) गट प्रमुखांमधील असलेला नेतृत्वगुणाचा अभाव -

बऱ्याचअंशी गटप्रमुखामध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याचे प्रशिक्षण देण्याची आवश्यकता होती. मात्र तसे करण्यामध्ये आपण कमी पडतो परिणामस्वरुप गटप्रमुखांना गटातील सदस्यांना एकसंघ ठेवण्यासाठी कृषि सहाय्यकाचीच मदत घ्यावी लागली व ती मदत सदासर्वकाळ कृषि सहाय्यकास देणे शक्य नसल्याने गटांमध्ये निराशा येत राहीली.

वरील सर्व विवेचनावरुन आपणास ध्यानात येईल की, केवळ कृषि विकासाचे उदीष्ट ठरवून त्या अनुषंगाने गट व त्यांचे समूह निर्माण करुन चालणार नाही तर प्रथम एक गोष्ट ध्यानात घ्यावी लागेल की 20 जणांना एक गट तयार करताना प्रत्येक सदस्य हा स्वतंत्र विचारसारणीचा, स्वतंत्र व्यक्तिमत्त्व असणारा व्यक्ति आहे व जेवढे व्यक्ति तेवढया प्रवृत्ती या उक्तीचा संदर्भ लक्षात घेवून या सर्व व्यक्तींना एका समान धाग्याने बांधुन ठेवणारा सामाजिक, बौध्दिक उपक्रम गटास देण्याची गरज आहे. जेणेकरुन सदस्यांमध्ये प्रेम, जिव्हाळा, उत्पन्न होऊन त्याओढीपोटी गट एकत्र येत राहील व अशी गट एकत्र येत राहील व अशी गट एकत्र येण्याची प्रक्रिया चालू राहिली म्हणजे ते विकासात्कम समान कार्यक्रमावर कार्य करत राहतील कारण केवळ कृषि विकास हा एकच धागा या सदय्यांना एकत्र ठेवण्यामध्ये सक्षम होणार नाही कृषि विकासाचे अंतिम उद्दिष्ट म्हणजे शेतकऱ्यांची उन्नती व त्याद्वारे शेतकरी सुखी बनविणे व ही उन्नती त्यांच्या हाती अधिकचा पैसा येण्याने घडणार अशी आपली संकल्पना आहे, परंतु केवळ जास्तीचा पैसा मिळविणे या भौतीक संकल्पनेद्वारे लोकांना एकत्र ठेवणे जवळ जवळ अशक्य आहे. कारण शेतकऱ्यास शेतीमधून नफा जरी मिळत गेला तरी त्याची व्यक्तिगत आर्थिक भूक भागविण्यामध्ये तो पैसा अपयशी ठरणार मात्र त्याचे विरुध्द ही त्यांची भूक वाढतच जाणार आहे. परिणामस्वरुप वाढणाऱ्या

अपेक्षांची प्रतिपूर्ती होत नाही म्हटल्यावर भगवद्गीतेमध्ये भगवान श्रीकृष्णांनी दुसऱ्या अध्यायात सांगीतल्यानुसार

ध्यायतो विषयान्पुंसःसड स्तेषूपजायते।

सडात्सआयते कामः कामाक्रोधो भिजायते ।।2.62।।

क्रोधाभ्दवति सम्मोहः सम्मोहात्स्मृतीविभ्रमः।

स्मृतीभ्रंशाद बुध्दिनाशो बुध्दिनशात्प्रणश्यतित ।।2.63।।

इंद्रियाविषयाचे (सुखाचे ) चिंतन करीत असतांना मनुष्याची त्या विषयांच्या ठिकाणी आसवक्ती वाढत जाते आणि अशा आसक्तीपासून काम उत्तन्न होतो आणि कामापासून क्रोधाचा उद्भव होतो. क्रोधापासून संम्मेह निर्माण होतो आणि मोहापासून स्मूती भ्रमीत होते. जेव्हा स्मूती भ्रमित होते तेंव्हा बुध्दीनाश होतो आणि बुध्दीनाश होतो तेंव्हा मनुष्याचे पतन होते.

म. फुले यांनी देखील विद्येविना मती गेली, मती विना गति गेली, गती बिना वित्त गेले. वित्ताविना शुद्र खचले असे सांगून विद्येचे महत्व स्पष्ट केले आहे. म्हणजेच अपेक्षा प्रतिपूर्ती न होण्याचा अंतिम परिणाम हा त्यांची बुध्दी नष्ट होण्यामध्ये होणार आहे व त्याद्वारे एकत्रित राहण्याच्या संकल्पनेचा अस्त होणार आहे. याउलअ शेतकऱ्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक व बौध्दीक पातळीला विकासात चालना देण्याच्या संकल्पनेवर आधारीत गटाची उभारणी झाल्यास गट शाश्वतरित्या एकत्रित राहण्यासाठी मदत मिळणार आहे.

सर्व प्राणीमात्रामध्ये मानवाच्या बुध्दीचे कोतुक केले कारण बुध्दी ही मानवास योग्य नि सारासार निर्णय घेण्यास मदत करते. प्रत्येक प्रश्नाचे अचूक उत्तर बौध्दीक चातुर्याच्या जोरावर

मनुष्य मिळवू शकतो. त्यामुळे पाच बौध्दीक क्षमतेवर मनुष्य स्वत: चे खरे सुख कशात आहे? व ते सुख प्राप्त कसे होवू शकते? माझ्या चालू व्यवसायाचे माध्यमातून मी नक्की कसा सुखी बनू शकेल? या प्रश्नाची उत्तरे प्राप्त करु शकतो व या प्रश्नांची अचुक उत्तरे प्राप्त झाल्यास स्वत:च्या क्षमतेपेक्षा जास्तीच्या हव्यासाचा त्याग करणे, प्रामाणिकपणे ऐकमेकांना सहाकार्य करणे, इतरांचा द्वेष करण्यापेक्षा स्वत: प्रयत्न करणे यागुणांचा विकास करु शकतो. थोडक्यात अवास्तव स्वप्नविलास करण्याऐवजी व्यवहार्य भूमिकेत शेतकऱ्यांची मनोभूमीका निर्माण केल्यास सदस्यांना एकत्र राहणे शक्य आहे. व अशा चारित्र्यगुणांचा विकास त्यांना आध्यामित्मकतेच्या शृंखलेत जोडल्यासच होऊ शकतो. दुर्दैवाने सद्याची शिक्षणपध्दती चारित्र्यसंपन्न व्यक्ति निर्माण करण्याऐवजी तांत्रीक कार्यकुशल मजूर निर्माण करणारी आहे. त्यामुळे प्रत्येक संस्कृतीमध्ये असणारे प्राचीन धर्मग्रंथ याबाबत महत्वाची भूमीका बजावतात त्यामध्ये भगवद्‌गीता, कुराण, बायबल, तोरॉह यांचा उल्लेख करता येईल. मात्र केवळ धर्मनिरपेक्षतेच्या नावाखाली लोकांना या धर्मग्रंथाचे शास्त्रशुध्द शिक्षण घेण्यास सद्यस्थितीत कोणतीही संस्थात्मक व्यवस्था नसल्याने अनौपचारिक पातळीवर समाजामधील संत, समाजसुधारकांचे माध्यमातून काही प्रमाणात लोकांना हे प्रशिक्षण मिळते. त्यामुळे सदरच्या गटांची निर्मिती करताना गटांना आपल्या हस्तक्षेपाशिवाय असे प्रशिक्षण मिळते. त्यामुळे सदरच्या गटांची निर्मिती करताना गटांना आपल्या हस्तक्षेपाशिवाय असे प्रशिक्षण घेण्यासाठी प्रवृत्त केल्यास गटामधील सदस्यामध्ये प्रेम, जिव्हाळा उत्पन्न होऊन एकसंघता राहण्याच्या गटाच्या प्रयत्नास उत्तेजन मिळू शकते व सदस्यांमधील अनावश्यक आक्रमक भूमिका

घेण्याची प्रवृत्ती तसेच स्वत:चाच स्वार्थ पाहण्याची प्रवृत्ती कमी होऊन एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ या उक्तीप्रमाणे गट अर्थाने सक्रिय राहू शकतो.

## शेतकरी गट व समूह निर्माण करण्यासाठी अवलंबण्यासाठी पध्दत

कृषि विभागाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार 20 शेतकऱ्यांचा एक गट करावयाचा आहे व अशा 5 ते 10 गटांचा एक समूह निर्माण करावयाचा आहे. अर्थात समूह निर्माण करताना त्यामध्ये किती गटांनी सहभागी वहवे यासाठी उद्देश हा महत्वाचा घटक राहणार आहे. ज्याद्वारे त्या समूहामध्ये किती गटांनी समाविष्ठ व्हावे हे ठरु शकते. उदा. टोमॅटो पिकावर प्रक्रिया करुन पदार्थ बनविण्यासाठी संपूर्ण शेतकरी म्हणजे 50 गट सामावू शकतील म्हणजेच गट निर्माण करतांना एकाच उद्देशाने प्रेरित असणारे व समान क्रयशक्ती असणारे सदस्यच त्या गटामध्ये निवडणे आवश्यक आहे. त्यामुळे गट निर्मिती करतांना सहभागी होणाऱ्या सदस्यांना खालील प्रमुख उद्देशाची जाणीव करुन त्यापैकी तो कोणत्या उद्देशापूर्तीच्या अनुषगाने सहभागी होत आहे हे तपासणे गरजेचे आहे तसेच गट करताना प्रथम पीक पध्दतीवर आधारित निश्चित करणे सोईचे राहणार आहे. त्यादृष्टीने पुणे जिल्ह्यामध्ये असणाऱ्या पिकांचा विचार करता खालील पिक गट प्रस्तावीत करणेत येत आहेत. अर्थात स्थानीक परिस्थितीवर आधारीत अजूनही वेगळे गट प्रस्तावीत होवू शकतात.

1) भात 2) ज्वारी, बाजरी, गहू यांचे एकत्रित अथवा स्वतंत्र 3) हरभरा 4) मूग 5) वाटाणा 6) ऊस 7) सोयाबीन 8) भुईमूग 9) करडई 10) भाजीपाला 11) सिताफळ

12) डाळींब 13) केळी 14) द्राक्ष 15) आंबा 16 इतर फळपिके 17 टोमॅटो स्वंतत्र गट

18) सेंद्रीय शेती.

उपरोक्त पध्दतीने गट निश्चिती झाल्यानंतर वैयक्तीक शेतकऱ्यांचा उत्साहीपणा, आर्थिक कुवत मुद्दयांचे अनुषंगाने खालील प्रमुख दोन उद्देशपूर्तीवर आधारित गटामध्ये सहभाग होण्याची संधी द्यावी.

1) **उत्पादन वाढ घडविणे -** यामध्ये ज्या शेतकऱ्यांना मोठ्या प्रक्रिया प्रकल्पामध्ये आर्थिक समस्यामुळे सहभाग घेणे शक्य होणार नाही मात्र नवनवीन तंत्रा ानाचा अवलंब करुन उत्पादन वाढ घडवून आणण्याची इच्छा आहे. तसेच उत्पादन खर्च कमी करुन विक्रीव्यवस्थेसाठी एकत्रित प्रयत्नाद्वारे जास्तीचा आर्थिक लाभ मिळविण्याची इच्छा आहे अशा शेतकऱ्यांचा सहभाग घ्यावा.

2) **उत्पादन, प्रक्रिया व मुल्यवर्धन घडविणे -** यामध्ये शेतकऱ्यांकडे भविष्यात प्रक्रिया प्रकल्प उभारणीची इच्छा असावी तसेच विपणन व्यवस्थेत नवीन प्रयोग करताना येणारा सुरुवातीचा जादाचा खर्च करण्याची तयारी असावी जेणेकरुन हे सदस्य शेतकरी सुरुवातीपासूनच्या अशा उद्देशाने काही रक्कम बचत म्हणून दरमहा बँकेमध्ये ठेवू शकतील व भविष्यामध्ये त्या पिकामध्ये उत्पादक ते ग्राहक अशी थेट व्यवस्था निर्माण करतील व अशा उद्देशपुर्तीच्या अनुषगाने एकत्र येणाऱ्या त्या पिकाकरीता वेगळा समुह निर्माण करता येईल.

1. उपरोक्त वर्णीत उद्देशपूर्ती व पिकानूसार गट विचार करुन प्रत्येक कृषि सहाय्यकाने चालू वर्षी किमान 5 व कमाल 10 गट निर्मितीचे उद्दीष्ठ ठेवावे जेणेकरुन त्याचे कार्यक्षेत्रामधील 100 ते 200 शेतकऱ्यांना चालु तो गट प्रक्रियेमध्य समाविष्ट करु शकेल.

**2. गटाची निर्मिती व गटातील सदस्यांची निवड.**

**गटातील सदस्यांची निवड करताना खालील प्रमाणे निकष लावावेत**

1) गटातील सदस्याचे नावे जमीन असणे आवश्यक आहे.

2) ज्या शेतकऱ्याचे नांवे जमीन आहे अशा शेतकऱ्यांच्या कुटूंबांतील व्यक्ती गटाचा सदस्य होण्यास पात्र असेल. तथापी जमीन मालकाने तो कुटूबांतील सदस्य असल्याचे प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. जमीन मालक किंवा त्याच्या कुटूंबातील सदस्य या पैकी कोणताही 1 च व्यक्ती गटामध्ये सदस्य म्हूणन पात्र राहील.

3) गटाच्या एकुण संख्येच्या 25 टक्के पेक्षा कमी संख्येमध्ये गटाने स्वीकृत केलेले भूमिहीन शेत मजूर व्यक्ती.

4) गटामधील सदस्यांची निवड करताना शक्यतो 1) त्याच वाडी / वस्ती / गावातील 2) शेजारच्या गावातील 3) अथवा वाहतुकदृष्टया सोईच्या असणाऱ्या जवळपासच्या गावामधील शेतकऱ्यांचा विचार करावा जेणेकरुन शेतकऱ्यांना त्यांचे गटाचे सभेस उपस्थित राहणे सोईचे जाईल.

5) कृषि सेवा पुरविणाऱ्या भूमीहीन शेतमजुरांचा देखील स्वतंत्र गट निर्माण करता येईल.

**3) शेतकऱ्याचे गट निर्मितीची पध्दत :-**

अशा रितीने गट निश्चिती व सदस्य निश्चिती झाल्यांनतर सदस्यांचा विहित नमुन्यातील अर्ज संबंधीताकडून भरुन घ्यावा व कृषि सहाय्यकाने सर्व 20 सदस्यांची एकत्र सभा बोलावली त्या सभेमध्ये गट निर्माण करण्याची आवश्यकता, उद्देश, गटाची भावी वाटचाल या दृष्टीने मार्गदर्शन करावे त्यानंतर गटास त्यांचे अध्यक्ष व सचिव यांची निवड करण्याची मुभा द्यावी. गटाच्या पहिल्या सभेचे इतिवृत्त विहीत नमुन्यामध्ये तयार करण्यात यावे व त्या इतिवृत्तावर गटातील सर्व सदस्यांची स्वाक्षरी घ्यावी. व तद्नंतर कृषि सहाय्यक/ समन्वयकाने इतिवृत्त प्रमाणित करावे. प्रमाणित इतिवृत्ताच्या प्रतीसह गटाचे अध्यक्ष / सचिव यांनी विहित नमुन्यातील प्रस्ताव गटाचे आत्मा अंतर्गत नोंदणीसाठी तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. तालुका कृषि अधिकारी यांनी गटाची बँकेत खाते उघडणे बाबत पत्र द्यावे. (राष्ट्रीयकृत बँक, सहकारी बँक ) संबंधित गटांनी त्याच्या सोयीच्या बँकत खाते उघडावे व नोंदणी प्रमाणपत्रासाठी तालुका कृषि अधिकारी यांचेकडे विहीत नमुन्यातील अर्ज सादर करावे तालुका कृषि अधिकारी यांनी आत्मा अंतर्गत गट नोंदणीचे प्रमाणपत्र गटास द्यावे गटाने नोंदणी शुल्क म्हणून 1000/- फी धनादेशाद्वारे प्रकल्प संचालक तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, पुणे या नावांने द्यावे. नोंदणी सोबतच गटास ठेवावयाच्या आवश्यक अशा नोंदवह्या (इतिवृत्त नोंदवही, जमाखर्च नोंदवही, पावती पुस्तक इ. ) गटास तालुका कृषि अधिकारी यांनी द्याव्यात. गटाचे नोंदणीपत्र व बॅकेतील खाते यामुळे गटाची ओळख निर्माण होईल व गटास एक अधिकृतता येईल. त्याद्वारे गटातील सदस्यामध्ये आत्मविश्वास वाढेल.

**4) गटाची नोंदणीसाठी लागणारे आवश्यक कागदपत्र.**

1. सदस्यांचा गटात सहभागी होणे बाबतचा अर्ज.
2. लाभार्थ्यांचे 7/12, 8-अ चे उतारे , 7/12, 8-अ नसल्यास जमीन मालकाच्या कुंटंबातील सदस्य असल्याचं प्रमाणपत्र.
3. सदस्यांचा पहील्या सभेचा कृषि सहाय्यकांनी प्रमाणित केलेले विहित नमुन्यांतील इतिवृत्त.
4. गटाचे बँकेचे पासबुकची झेरॉक्स.

# गटाची नियमावली

| अ.क्र | मुद्दा | ठरविलेला नियम |
|---|---|---|
| 1 | सभा साप्ताहीक / पक्षीक / मासीक | |
| 2 | मासीक वर्गणी | |
| 3 | खर्चाचे अधिकार | |
| 4 | सदस्याचा राजीनामा व नवीन सदस्याची स्वीकृती. | |
| 5 | सदस्य मयत झाल्यास त्याचे ऐवजी दुसरा सदस्य घेण्याची पध्दती. | |
| 6 | सदय्यास अपात्र करण्यासंबधिचे नियम. | |

5. **गटाची नोंदणी व प्रमाणपत्र .** गटाचे विहित नमुन्यातील प्रस्ताव कृषि अधिकारी कार्यालयास प्राप्त झाल्या नंतर प्रस्तावाची छाणणी करण्यात येवून बँकेत खाते उघडण्याबाबतचे व गट नोंदणी बाबतची पुर्व संमती तालुका कृषि अधिकारी यांनी देण्यांत यावी. गटाने बँकेत खाते उघडल्या नंतर तालुका कृषि अधिकारी यांना बँक खात्याच्या पासबुकची झेरॉक्स प्रत देण्यांत यावी. बँक खात्याची पासबुक झेरॉक्स प्राप्त झाल्यानंतर तालुका कृषि अधिकारी यांनी सदर गटाची आत्मा अंतर्गत नोंदणी करावी व त्यांना विहीत नमुन्यातील नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करावे.

नोंदणीसाठी गटाकडुन 1000/- रु फी धनादेशाद्वारे प्रकल्प संचालक तथा जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, या नावाने नोंदणी शुल्क घ्यावेत व नोंदणी शुल्क घ्यावेत व नोंदणीबरोबरच गटास रेकॉर्ड ठेवण्यासाठी आवश्यक अशा नोंदवहया (इतिवत्त नोंदवही ,जमा खर्च नोंदवही व पावती पुस्तक ) नोंदणी शुल्कातील रकमेतून द्यावेत.

6. गटाने भविष्यामध्ये कृषि विषयक मोठ्या अनुदानातील योजनांचा लाभ घेण्याचे दृष्टिने नियमित बचत सुरु करावी. जेणे करुन भविष्यामध्ये बँक कर्जआधारित प्रकल्प सुरु करणेसाठी गटास कर्जपुरवठा व शासकीय अनुदान मिळणे सोईचे जाईल यामध्ये अर्थातच जे गट प्रक्रीया व मुल्यवार्धन याबाबीसाठी एकत्र येणार आहेत त्यांचेसाठी ही बचत अनिवार्य राहणार आहे. तसे जे गट उत्पादनवाढीच्या अनुषंगाने एकत्र येणार आहेत त्यांचेसाठी ही बचत अनिवार्य राहणार आहे. तसेच जे गट उत्पादनवाढीच्या अनुषंगाने एकत्र येणार आहेत त्यामध्ये बचतीची रक्कम मोठी न ठेवता करणे आवश्यक राहील. जेणे करुन एकत्रित निविष्ठा खरेदीसाठी गटाकडे भांडवल उपलब्ध राहील व ऐनवेळस रक्कम द्यावयाची झाल्यास गटास अडचण उद्भवणार नाही. त्यादृष्टीने

सदस्याकडून जमा होणाऱ्या बचतीचा हिशेब ठेवण्यासाठी विहित नमुन्यातील नोंदवही ठेवावी. तसेच सदस्याने बचत. अध्यक्ष / सचिवाकडे जमा केल्यानंतर प्रथम गटाने त्यांचे पावती ठेवुन सदस्यास जमा रकमेची पावती द्यावी.

7. गटातील सदस्यांची निवड, गटनिर्मिती, गटाची आत्मा संस्थेअंतर्गत नोंदणी, गटाचे बँक खाते उघडणे व गटास तालुका कृषि अधिकारी यांचेमार्फत आवश्यक नोंदवह्या मिळवून देणे या प्रकरणामध्ये कृषि सहाय्यक अथवा गट समन्वयक यांनी सक्रिय सहभाग घ्यावा. त्यानंतर कृषि सहाय्यकांनी गटांचे मासीक सभेस उपस्थित राहुन गटाने कामकाज व्यवस्थित चालु आहे किंवा नाही हे पहावे व याबाबतचे अभिप्राय गटाचे इतिवृत्तांचे नोंदवहीमध्ये द्यावेत. **मात्र गटाच्या कामकाजामध्ये त्यांनी कोणताही हस्तक्षेप करु नये.**

8 गटाचे नोंदणनंतर तालुका कृषि अधिकारी यांनी दरवर्षी एप्रिल व में महिन्यामध्ये गटाचे मुल्यमापन करावे त्यासाठी त्यांचे कार्यक्षेत्रातील मंडल कृषि अधिकारी यांना गआचे मुल्यमापन करणेसाठी नियुक्त करावे. गटाचे मुल्यमापन करणेसाठी खालील पाच निकष लावावेत.

| अ.क्र | निकष | गुण | शेरा |
|---|---|---|---|
| 1 | गटाच्या नियमीत मासीक बैठका त्यामधील संदस्यांची उपस्थिती इतिवृत्त नोंदवही इ. | 40 | 70 ते 100 गुण मिळाल्यास अ |
| 2 | गटाचे उद्देशाचे अनुषंगाने झालेले कार्य | 25 | 50 ते 59 गुणास ब |
| 3 | गटाची नियमित बचत | 20 | 40 ते 59 गुणास क |
| 4 | गटाने सी.ए.मार्फत करुन घेतलेले लेखापरिक्षण | 10 | 39 गुणाखाली ड मुल्यांकंन द्यावे |
| 5 | नावीण्यपुर्ण उपक्रम | 5 | |
| | | 100 | |

उपरोक्त निकशावर आधारित मुल्यांकन करुन गटास मुल्यांकन पत्र द्यावे मात्र त्यामध्ये सदरचे मुल्यांकन हे संपूर्ण तांत्रीक स्वरुपाचे असुन त्याचा आर्थीक व्यवहाराशी कोणताही संबंध नसल्याचे नमूद करावे जेणेकरुन आर्थिक व्यवहार हा संपूर्णपणे गटामधील जबाबदार प्रतिनिधीचा प्रश्न राहील. तसेच या संनियंत्रण पध्दती मुळे गटामध्ये चांगले कार्य करण्यासाठी निकोप स्पर्धा निर्माण होईल व सदरचे मुल्यांकनामुळे गटास बाजारात एक पत निर्माण होईल. तसेच शासकीय अनुदानीत योजनांचा लाभ देताना गटास प्राधान्यक्रम देताना सुलभ जाईल.

## गटांनी कृषी विषयक करावयाची कामे-

1) गटाकडे स्वत चे पुस्तकालय असावे.त्यामधील पुस्तकांची विभागणी पुढील प्रमाणे असावी .

1)आध्यात्मीक साहित्य 2) प्रेरणादायी चरित्र 3)ज्या पिकाकरीता गटस्थापना केली आहे त्या पिकावरील उत्पादन, प्रक्रिया व विक्रिबाबतचे साहित्य . 4) शेतकरी मासिक.

* **ग्रामबिजोत्पादन कार्यक्रम -** ज्या पिकाकरीता गट स्थापन केला आहे त्या पिकाचे सरळवाण लागवडीमध्ये असल्यास गटाची बियाणे गरज लक्षात घेवून त्यानुसार पायाभूत बियाणे उपलब्ध करुन घेऊन ग्रामबिजोत्पादन कार्यक्रमाद्वारे गटाची गरज भागविणे.

* गटास लागणारी औजारे एकत्रित खरेदी करुन आवश्यतेनुसार त्यांचा गटामधील सदस्यामध्ये वापर करणे.

* गटातील सदस्याकरीता संबंधित पिकाकरीता आवश्यक असणाऱ्या निविष्ठा (खते, औषधे इ.) एकत्रितरित्या गटाने स्वतः किंवा समूहामार्फत खरेदी करुन सदस्यामध्ये वितरीत करणे.

* उत्पादीत मालावर करावयाची प्राथमिक प्रक्रियेसाठी गटांचेस्तरावर अथवा समुहस्तरावर प्रयत्न करणे.

* सदस्याच्या मालाच्या एकत्रित विपणनासाठी प्रयत्न करणे.

* सदस्यांनी एकत्रितरित्या कृषि विषयक अभ्यास दौरा करणे किंवा समूहामार्फत आयोजित कृषिविषयक सहलीमध्ये सहभाग घेणे

* नियमित बचत करुन भविष्यामध्ये करावयाच्या मोठ्या प्रकल्पासाठी आर्थीक तरतूद करणे.

* पिक विमा योजनेमध्ये सहभाग.

* वैयक्तिक अपघात विमा योजनांमध्ये सदस्यांकरीता संरक्षित विमा रक्कम भरणे इ.

* शेतीशाळा.

* मृदा आरोग्य पत्रिका

## * समूह निर्मिती. *

तालुकास्तरावर गटाची नोंदणी झालेनंतर तालुका कृषि अधिकारी यांनी मंडल कृषि अधिकारी यांचे समवेत सभा घेवून समान पिक व समान उद्दीष्ट व सदस्यांचे वाहतूकीसाठी सुलभता यांचा विचार करुन समुह निश्चित करावा व गरजेनुरुप 5 ते 10 गटांना एका समूहामध्ये घ्यावे व अशारितीने समूहाचे

निश्चिती झालेनंतर त्या समूहासाठी कृषि पर्यवेक्षक अथवा मंडळ कृषि अधिकारीस्तराचे अधिकारी यांना समूह व्यपस्थापक (Cluster manager ) म्हणून घोषित करावे.

## • समूह व्यवस्थपक (cluster manager )

### * कार्ये व जबाबदाऱ्या -

- ➢ तालुका कृषि अधिकारी यांनी निर्देशित करुन दिलेल्या व समूहामध्ये समाविष्ट करावयाच्या गटांच्या अध्यक्ष व सचिव यांच्या एकत्रित सभेचे आयोजन करणे.
- ➢ पहिल्या सभेमध्ये समूह निर्मितीची संकल्पना आवश्यकता व समुहांची कार्ये विशद करणे.
- ➢ समूह निर्मितीचा ठराव करुन पहिल्या सभेमध्येच समूहाचे अध्यक्ष व सचिव यांची सर्वानुमते निवड करुन घेणे.
- ➢ समुहाच्या पहिल्या सभेचे विहित नमुन्यातील इतिवृत्त प्रमाणीत करणे.
- ➢ समुहाची तालुका कृषि अधिकरी यांचेकडे नोंदणी करणेकामी समुहाचे अध्यक्ष व सचिव यांनासहाय्य करणे.
- ➢ समुहास बँक खाते उघडण्यासंबंधात करणे.
- ➢ किमान वर्षभर समूहाचे सभेस नियमित उपस्थित राहुन मार्गदर्शन करणे.
- ➢ समुहांने ठेवावयाच्या नोंदवह्याबाबत मार्गदर्शन करणे.

समूहाची पहिली सभा होवुन निर्मिती झालेनंतर समुहाचे नवनिर्वाचित अध्यक्ष व सचिव यांनी तालुका कृषि अधिकारी यांचेकडे समूहाच्या नोंदणीसाठी व बँक खाते उघडण्यासाठी प्रस्ताव सादर करावा. प्रस्तावासोबत खालील कागदपत्रे जोडावीत.

1) अर्ज

2) समूहामध्ये समाविष्ट गटांची संक्षिप्त माहितीचे प्रपत्र.

| **अ.क्र** | **गटाचे नांव** | **गटातील सदस्य संख्या** | **गटाचे अध्यक्ष व सचिव यांची नांवे** | **मोबाईल दुरध्वनी क्रमांक** | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |

3) समूहाच्या पहिल्या बैठकीचे इतिवृत्त (सोबत नमुना )

4) समूहातील समाविष्ट गटांच्या नोंदणीपमाणपत्राच्या सत्यप्रती.

5) प्रत्येक गटांमध्ये समाविष्ट असणा-या सदस्याचा तपशील.

6) गटाचा समूहात सामील होण्याचा ठराव.

- समूहाचा परिपूर्ण प्राप्त झाले नंतर तालुका कृषि अधकारी यांनी त्यांना बँकेत खाते उघडण्यासंदर्भात परवानगी द्यावी व समूहास नोंदणीपत्र द्यावे.

- समूहाचे तांत्रीक मुल्यांकन गटासाठी निश्चित केलेल्या मानकावर आधारित दरवर्षी करण्यात यावे.

## ❖ समूहामार्फत करावयाची कृषि विषयक कामे.

1) समूहाचे वाचनालय.

2) समूहाने कृषि विकास अधिकाऱ्यामार्फत खत, बियाणे व किटकनाशक विक्रि परवाना घ्यावा व समूहातील सदस्याकरीता सरळरित्या ह्या निविष्ठा खरेदी करण्याचे धोरण स्विकारावे.

3) मोठ्या खर्चाची यांत्रिकीकरणामधील औजारे उदा. ट्रॅक्टर, पॉवर टिलर समूहातील शेतऱ्यांना अल्प भाड्याने देण्यासाठी खरेदी करणे.

4) समूहाचे सहकार विभागाकडे उपलब्ध असणारी गोडाऊन भाड्याने घेवून समूहातील उत्पादने व औजारे यांचे साठवणूकीसाठी बापरावीत.

5) समूहातील संदस्याच्या शेती सहली.

***